# शाळापूर्व तयारी – उपचारात्मक ब्रीज कोर्स (15 ते 30 जून)

**मागील इयत्तेच्या अध्ययन निष्पत्तीवर आधारित अभ्यासक्रम समाविष्ट**

- चित्र पाहून दिलेली गोष्ट वाचा व वहीत पूर्ण करा.

टेस्ट सोडवा

## आम्ही गोष्ट पूर्ण करतो

- वाचा.









रविवारची सुट्टी होती. संध्याकाळच्या कलत्या उन्हात मुले खेळायला बाहेर पडली. चांगला दहा–बारा जणांचा घोळका लगोरी खेळण्यासाठी जमला. रमा आणि शेखरने आपापले भिडू वाटून घेतले. दोन गट तयार झाले. शेखरच्या गटाने लगोरी रचली. रमाने चेंडू मारला आणि लगोरी फोडली... धाऽऽड्. लगोऱ्या विखुरल्या. चेंडू उसळला आणि रमाच्या गटातले भिडू पळू लागले. शेखरने चेंडू पकडला आणि नजमाकडे फेकला. तिने चपळाईने चेंडू झेलला आणि नेम धरून राजेशच्या दिशेने भिरकावला, त्याला बाद करण्यासाठी. राजेश खाली वाकला आणि चेंडू थेट मैदानाबाहेरच्या झाडीत गडप झाला. 'चेंडू झाडीत गेला, की खेळ तात्पुरता थांबवायचा', असा त्यांचा नियम होता. रमा, शेखर, मंजू, नजमा, जयेश सगळेच तिकडे धावले. नजमा चेंडू घ्यायला झाडीत जाऊ लागली. इतक्यात जयेश ओरडला, ''एऽऽ साऽऽप. तो बघ.'' ......

- पुढे काय झाले असेल ? कल्पना करा आणि गोष्ट पूर्ण करा.

टेस्ट सोडवा

खालील गुणाकार करा व तक्ता पूर्ण करा.







**गुणाकार**

| वस्तुरूपात | बेरीज रूपात | किती वेळा | किती पट | गुणाकार रूप | एकूण वस्तू |
|---|---|---|---|---|---|
|  | २+ २ + २ + २+ २ | दोन, पाच वेळा | २ ची पाचपट | २ × ५ | १० |
|  | ५ + ५ | … , दोन वेळा | ५ ची … पट | … × … | |
|  | … + … + … + … + … | …, पाच वेळा | … ची … पट | … × … | |
|  | ………………… | दहा, तीन वेळा | १० ची … पट | … × … | ……. |
|  | ………………… | चार, सहा वेळा | ……. | … × … | ……. |
|  | ………………… | ……. | ……. | … × … | ……. |

टेस्ट सोडवा

Multiply the following and complete the table.


**Multiplication**

| In the form of objects | As an addition | How many times | As a multi-plication | Total number of objects |
|---|---|---|---|---|
|  | 2 + 2 + 2 + 2 + 2 | 2, five times | 5 × 2 | 10 |
|  | 5 + 5 | ... , twice | ... × ... | ☐ |
|  | ... + ... + ... + ... + ... | ..., five times | ... × ... | ☐ |
|  | .................... | ten, three times | ... × ... | ....... |
|  | .................... | four, six times | ... × ... | ....... |
|  | .................... | ....... | ... × ... | ....... |


a-e-i


टेस्ट सोडवा

**1. Name the picture. Underline the first letter.**
चित्राचे नाव सांगा. पहिल्या अक्षराखाली रेघ ओढा.

| | | |
|---|---|---|
|  apple |  ant |  axe |
|  egg |  engine |  elephant |
|  ink |  insects |  injection |

**2. Read the name of the letter.**
अक्षराचे नाव वाचा.








**3. Trace the letter. Copy the letter.**
अक्षर गिरवा. पाहून लिहा.










**4. Draw the letter in the air.**
**Draw it with a finger on the back of your friend.**
अक्षर हवेत काढा. तुमच्या मित्राच्या / मैत्रिणीच्या पाठीवर बोटाने काढा.

टेस्ट सोडवा

वाचा व दिलेल्या प्रश्नांची उत्तरे वहीत लिहा.




१. आजोबा काय वाचत आहेत ?
२. ताई माहिती मिळवण्यासाठी कशाचा वापर करत आहे?
३. आजी काय पाहत आहे ?
४. दादा गाणी ऐकत आहे, त्यासाठी त्याने कानाला काय लावले आहे?
५. बाबा बोलण्यासाठी कशाचा वापर करत आहेत?
६. दारात कोण आले आहे? आई त्यांच्याकडून काय घेत आहे?

पत्र, संगणक, मोबाइल फोन, वर्तमानपत्र, टीव्ही, म्युझिक प्लेअर या गोष्टींचा वापर आपण करत असतो. ही सर्व साधने माहिती व निरोप मिळवण्यासाठी किंवा पाठवण्यासाठी वापरली जातात. ही संदेशवहनाची साधने आहेत.

- **बोलीभाषा**

माणूस हा एकमेकांशी भाषेच्या मदतीने बोलतो, आपले विचार दुसऱ्यापर्यंत पोहचवतो. एकच भाषा वेगवेगळ्या प्रदेशांत वेगवेगळ्या पद्धतीने बोलली जाते. प्रदेशांनुसार त्या भाषेतील शब्दांचे उच्चार बदलतात. तिच्यावर इतर भाषांचा प्रभाव पडतो. इतर भाषांतील शब्द आपल्या भाषेत येतात. अशा पद्धतीने वेगवेगळ्या प्रदेशांत एकाच भाषेच्या बोली तयार होतात. उदा., अहिराणी, मालवणी, वऱ्हाडी या मराठी भाषेच्या काही बोली आहेत. **मराठी** ही महाराष्ट्राची **राजभाषा** आहे.



| माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरून... | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे
वेब स्त्रोत-'ई-बालभारती'
सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in